# महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनी आकाश टॅबचे वितरण

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय.आय.टी.),मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आकाश-२ या टॅबचे वेळणेश्वर न्यू इंग्लिश स्कूल च्या इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले.

महाविद्यालयाच्या नाना फडणवीस सभागृहात आकाश-२ टॅबचा वितरण सोहळा ठीक सकाळी १० वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमास भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय.आय.टी.),मुंबईच्या आकाश प्रकल्पाच्या समन्वयक डॉ. किरण खोसला, विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा कामत, सह्याद्री शिक्षण मंडळाचे संचालक श्री. उमेश लकेश्री, न्यू इंग्लिश स्कूल,वेळणेश्वर शाळेचे मुख्याध्यापक श्री. भास्कर पवार व इतर मान्यवर उपस्थित होते.

तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा फायदा खेड्यातील शाळांना व्हावा तसेच शहरातील शैक्षणिक प्रगती व खेड्यातील शिक्षण व्यवस्था यातील दरी भरून काढण्याचे काम या आकाश-२ प्रकल्पामुळे होणार आहे. या उपक्रमात विद्यार्थी, शाळेचे शिक्षक व महाविद्यालयाचे प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे सहकार्य करून हा प्रकल्प यशस्वी करावा असे मनोगत डॉ. किरण खोसला यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी आकाश-२ या टॅबचे तंत्रज्ञान विकसित करण्यात सहभागी असलेले भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय.आय.टी.),मुंबई या प्रकल्पाचे इंजिनिअर श्री. पंकज पाटील यांनी आकाश-२ प्रकल्पातील बारकावे व टॅबच्या तांत्रिक घटकाविषयी माहिती दिली.

वेळणेश्वरमध्ये हा प्रकल्प आणण्याचा मानस असलेले विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आकाश-२ व प्रजासत्ताक दिन या दोन्ही बाबत आपले मनोगत व्यक्त केले. भारतातील संशोधकांचे तंत्रज्ञानातील योगदान अतिशय अभ्यासपुर्वकपणे समजावून सांगितले. तसेच महाविद्यालयाद्वारे सामाजिक व राष्ट्रीय दृष्टीकोनातून होणारा आकाश-२ हा प्रकल्प कसा राबवावा या विषयी मार्गदर्शन केले.

आकाश-२ प्रकल्पाचे प्रमुख व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय.आय.टी.),मुंबईतील संगणक अभियांत्रिकी या विभागाचे प्रमुख पद्मश्री डॉ. दिपक फाटक यांनी स्काईप या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे या प्रसंगी मार्गदर्शन केले. आकाश-२ प्रकल्प चालू करण्यामागील उद्देश, या अगोदर पंढरपूर येथे राबविल्या गेलेल्या प्रकल्पाचे अनुभव, शिक्षक, विद्यार्थ्यांकडून या प्रकल्पाविषयीच्या अपेक्षा त्यांनी या प्रसंगी व्यक्त केल्या. हा प्रयोगात्मक प्रकल्पात यशस्वी झाल्यावर शालेय स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना या टॅबचा व त्या संबंधित तंत्रज्ञानाचा फायदा होणार आहे असा आशावाद यांनी या प्रसंगी बोलून दाखविला.

वेळणेश्वर येथील न्यू इंग्लिश स्कूल या शालेविषयीची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा कामत यांनी सांगितली. नंतर त्या शाळेच्या ७६ विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते टॅबचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील अनेक माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. वेळणेश्वर शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थांनी या प्रकल्पाविषयी जाणून घेण्यासाठी उपस्थिती दर्शविली. तसेच श्री. राजू कुंभार, शाखा व्यवस्थापक, युनियान बँक,पालशेत हे या प्रसंगी उपस्थित होते.

याच दिवशी दुपारी १२ वाजता सर्व उपस्थित मुख्याध्यापकांचे व प्रौद्योगिकी संस्थान (आय.आय.टी.),मुंबईच्या आकाश-२ या प्रकल्पाच्या समन्वयक म्हणून काम पाहणाऱ्या डॉ. किरण खोसला यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले व या प्रकल्पासाठी आणखी काही शाळांचे सहकार्य मिळाल्यास तेथेही हा प्रकल्प राबवण्याची इच्छा त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.